# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुय्यम प्रशासकीय इमारत, पहिला मजला, कात्रप विद्यालयाजवळ, बदलापूर गांव रस्ता (पूर्व), कुळगाव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेल- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, संकेतस्थळ:- http://kbmc.gov.in

जावक क्र./कु-ब.न.प./नरवि/बां.प./ ५६०४-७७ /२०१७-२०१८ युनिक क्र. ७७ दिनांक : २५ /०७ /२०१७.

प्रति,
मे.अभिषेक शेल्टर्स लिमिटेड व श्रीमती.प्रगती बळीराम पिसेकर व इतर यांचे कु.मु.प.धारक
मे.चिंतामणी एन्टरप्राईजेस तर्फे भागीदार श्री.संजेश गोपाळ पातकर व श्री.दिपक पुखराज भंडारी,
द्वारा श्री.सतीश ओक ,वास्तूशिल्पकार,बदलापूर.

विषय : स.नं.१४१.स.नं.१४३ हि.नं.४अ.स.नं.१४४ हि.नं.१अ व २, मौजे बदलापूर, ता. अंबरनाथ, येथे करण्याच्या बांधकाम सुधारीत मंजूरी बाबत.
संदर्भ : आपला दि.४/५/२०१७ चा अर्ज क्र.१०९३३
श्री. सतीश ओक, वास्तुशिल्पकार, बदलापूर, यांचे मार्फत सादर केलेले अर्ज.
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये.

स.नं.१४१.स.नं.१४३ हि.नं.४अ. स.नं.१४४ हि.नं.१अ व २, मौजे बदलापूर, ता.अंबरनाथ, मध्ये १५०४०.०० चौ.मी. पैकी १४१२४.५४ चौ.मी. नियोजित क्षेत्र भूखंडाच्या विकास करावयास महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दि. ४/५/२०१७ च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत -------रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे,भाग स्टिल्ट,तळमजला/पहिला मजला/दुसरा मजला/तिसरा मजला/चौथा मजला/पाचवा मजला/सहावा मजला/सातवा मजला/आठवा मजला/रहिवास/वाणिज्य/दुकाने/वाडे भिंतीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत,सुधारीत बांधकाम परवाना/प्रारंभ प्रमाण पत्र देण्यात येत आहे. (इमारत क्र. २, ३, ४, ५, ६ व ७ करीता)

-: अटी : -

१. ही बांधकाम परवानगी दिलेल्या तारखेपासून एक वर्ष पर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नुतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहील. अशाप्रकारचे नुतनीकरण फक्त तीन वर्ष करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. नुतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेतांना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमाचा व नियोजित विकास आराखड्याच्या अनुषंगाने छाननी करण्यात येईल.
२. नकाशात------------------ रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.
३. महसुल व वन विभाग,महाराष्ट्र शासन, यांचेकडील दि.५ जानेवारी २०१७ चे अध्यादेश क्र.२ मधील लागु असलेल्या आदेशांचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहील.
४. बांधकाम चालू करण्यापूर्वी (७) दिवस आधी नगरपरिषद कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.
५. ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमिनीव्यतिरिक्त जमिनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.
६. बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटी प्रमाणे करता येईल. जोत्यापर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केल्या बाबतचे प्रमाणपत्र नगरपरिषदेस सादर करण्यात यावे त्यानंतरच जोत्यावरील बांधकाम करावे.
७. भूखंडाचे हद्दीत भोवती मोकळा सोडावयाच्या जागेत बदल करु नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.
८. बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये. तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्द झाली असे समजण्यात येईल.
९. इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची हमी (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपल्या वास्तुशिल्पकार व स्थापत्य-विशारद यांचेवर राहील.
१०. बांधकाम पुर्णतेचा दाखला/वापर परवानगी घेतल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये त्यासाठी जागेवर त्याप्रमाणे बांधकाम पुर्ण झाले आहे त्याचा नकाशा वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांच्या विहीत नमुन्यातील दाखल्यासह (५ प्रतीत) इतर आवश्यक कागद पत्रासह सादर करण्यात यावा.
११. बांधकाम चालू करण्यापुर्वी नगर भुमापन अधिकारी / भूमी अभिलेख खात्याकडून जागेची आखणी करुन घेण्यात यावी आणि तसा दाखला नगरपरिषदेकडे सादर केल्यानंतर बांधकाम सुरु करावे.
१२. नकाशात दाखविलेल्या गाळ्यांच्या संख्येमध्ये व नियोजनामध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल करु नये.
१३. नवीन इमारतीस मंजूर नकाशे प्रमाणे सेप्टीक टँक पाहिजे व मैलास भविष्य काळात जवळच्या मलनि:सारण नलिकेस स्वखर्चाने नगरपरिषद अभियंता यांचे परवानगीने जोडणे आवश्यक राहील. सेप्टीक टँक कमीत कमी ५० फूट अंतरावर असणे आवश्यक आहे.